संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# अन्यथा ते विकृतीला आमंत्रण ठरेल

**सध्याच्या** माहिती तंत्रज्ञानाच्या युगात माहिती स्वातंत्र्याला प्रचंड बळ मिळालेले आहे. परंतु या स्वातंत्र्याचा गैरवापर जर योग्यवेळी रोखला नाही तर त्याचे अनेक गंभीर परिणाम समोर येऊ शकतात. विशेषतः सोशल मीडियाचा अतिरेकी वापर आता अधिक धोकादायक ठरू लागला आहे. लोकशाही व्यवस्थेत अभिव्यक्ती स्वातंत्र्य कायद्यानुसारच दिले जाते. परंतु त्याला सामाजिक नीतीमूल्यांचे बंधन नसेल तर हे स्वातंत्र्य स्वैराचाराकडे वळते. आज काहीशी तशीच परिस्थिती निर्माण झाली आहे. समाजमाध्यमांवर उपलब्ध असलेले व्हॉट्सॲप, फेसबुक, इन्स्टाग्राम किंवा यूट्यूबसारख्या प्रकारातून ज्या पद्धतीची माहिती प्रसारित होते. सर्वच माहिती उपयुक्त असते असे नाही. जवळपास साठ टक्के माहिती ही परस्परविरोधी आणि वस्तुस्थितीचा विपर्यास करणारीदेखील असते. या माध्यमांचा विचारपूर्वक वापर हा प्रकारच कमी होत चालला आहे. मनमानी पद्धतीने त्याचा उपयोग करण्याकडेच अनेकांचा कल असतो. विशेष म्हणजे समाजमाध्यमांच्या सकारात्मक उपयोगापेक्षा नकारात्मक किंवा विध्वंसक व्यापारातून पैसे कमावण्याचाही विकृत प्रकार पाहायला मिळतो. जगभरातल्या अनेक देशांमध्ये ही विकृती वेगाने फोफावते आहे. यासाठी समाजातला तरुण वर्ग आणि त्याबरोबरच शालेय विद्यार्थी हेसुद्धा टार्गेट केले जात आहेत. भारतासारख्या देशात मोबाईल ही आता दैनंदिन वापराची अनिवार्य वस्तू आहे असे समजून तिचा वापर होतो. शालेय विद्यार्थ्यांच्या हातात असणारा मोबाईल त्यांच्यासाठी अनेक प्रकारे धोकादायक ठरतो आहे. यासंदर्भात देशपातळीवरही अनेक ठिकाणी अपघात झाला आणि लहान मुलांच्या मोबाईल वापरावर जर नियंत्रण आले नाही तर येणारी ही पिढी अनेक दृष्टींनी विकृत किंवा नकारात्मक मानसिकता तयार करणारी ठरेल. हा धोका लक्षात घेऊनच अलिकडेच कर्नाटक आणि आंध्र प्रदेश सरकारने सोळा वर्षाखालील विद्यार्थ्यांच्या मोबाईल वापरावर बंधने आणण्याचा निर्णय घेतला आहे. जागतिक पातळीवर बऱ्याच देशांमध्ये लहान मुलांच्या मोबाईल वापरावर नियंत्रण आणले गेलेले आहे. भारतालासुद्धा या गोष्टीचा गांभीर्याने विचार करण्याशिवाय पर्याय उरलेला नाही.

### कर्नाटक सरकारचा निर्णय

विशेषतः शालेय विद्यार्थ्यांकडून मोबाईलचा वापर सर्वाधिक प्रमाणात होतो. म्हणजे अभ्यासापेक्षाही मोबाईलवर त्यांचा सर्वाधिक वेळ जातो. प्रदीर्घ काळ मोबाईलच्या स्क्रीनवर राहण्याचे मानसिक दुष्परिणाम समोर येऊ लागलेले आहेत. ज्यातून कुटुंब व्यवस्था आणि एकूणच समाज व्यवस्थेवरही परिणाम होण्याची शक्यता आहे. मोबाईलच्या या अतिवापराने अभ्यासापेक्षा इतर बाबींमध्ये गुंतून पडणारे विद्यार्थी किंवा मुलं स्वतःचा आत्मविश्वास गमावतात. त्यांच्यामध्ये स्वकेंद्रीतपणा येतो. मनासारख्या काही गोष्टी झाल्या नाहीत तर मुलांच्या वागणुकीत चिडचिडेपणा किंवा शीघ्रकोपीपणा वाढीला लागतो. अनावश्यक मोबाईलवरच्या गेम्समध्ये वेळ घालवण्याबरोबरच पैसे लावून ऑनलाईन गॅंबलिंगसारखे प्रकारही त्यांच्याकडून होतात. डोळ्यांच्या विकाराबरोबरच मेंदूंचे विकार वाढीला लागल्याचे समोर येते आहे. सतत मोबाईलच्या संपर्कात राहिल्याने कुटुंबातला संवादही कमी होतो. अशा एक ना अनेक प्रकारच्या संकटांची शृंखला या मोबाईलवरच्या अतिवापराने निर्माण झालेली आहे. म्हणूनच कर्नाटक सरकारने शाळांमधून विद्यार्थ्यांच्या मोबाईल वापरावर बंधने घातली आहेत. आंध्र सरकारही त्याच पद्धतीची उपाययोजना करणार आहे. मोबाईलच्या अतिवापराचा धोका म्हणजे विकृतीला आमंत्रण देणारा ठरतो. जर यासंदर्भात काही नियमावली तयार केलेली नाही तर त्याच्या अनिर्बंध वापराचे दुसरे पर्यवसान म्हणजे लहानपणापासूनच अनेकांची गुन्हेगारी वृत्तीही वाढण्याची भीती व्यक्त केली गेलेली आहे. ज्या वयामध्ये विद्यार्थ्यांच्या मनाची आणि मेंदूची सकारात्मक विधायक जडणघडण होणे आवश्यक असते, त्या काळात मोबाईल नावाचा विध्वंसक प्रकार हाती दिला जातो आहे. पालकांकडून याबाबत कोणतीही विशेष खबरदारी घेतली जात नाही. किंबहुना मोबाईल वापराला नकार देण्यावरून मुलांनी आत्महत्या करण्यासारखे प्रकारही घडले आहेत. शालेय वयात जर त्यांच्यात हिंसकपणा वाढत असेल तर भविष्यात हा धोका नियंत्रणाबाहेर जाण्याचीही शक्यता आहे. एकीकडे सोशल मीडियाचा अतिरेकी वापर तर दुसरीकडे विद्यार्थ्यांना लक्ष्य करून त्यांच्यातही विकृती निर्माण करण्याचे कारस्थान व्यवस्थितपणे आकाराला येते आहे. कर्नाटकसारख्या राज्याने यासंदर्भातली काही उदाहरणं प्रत्यक्ष अनुभवली आहेत. म्हणूनच त्याच्या वापरावरचे निर्बंध सरकारला महत्त्वपूर्ण वाटलेले दिसतात.

### महाराष्ट्रातही उपाय हवेत

भारतासारख्या मोठी लोकसंख्या असलेल्या देशाला खूपच दक्षता घ्यावी लागणार आहे. महाराष्ट्र सरकारदेखील विद्यार्थ्यांमधल्या मोबाईल वापराबाबत काही उपाययोजना करण्याच्या मनस्थितीत आले आहेत. अनेकांना शालेय स्तरावरच्या विद्यार्थ्यांच्या मोबाईल बंदीबाबत शंका वाटू लागते. कारण अलिकडे अनेक शाळांमधून विद्यार्थ्यांना ऑनलाईनच अभ्यास दिला जातो किंवा अगदी पालकांशी संपर्क ठेवण्यासाठीसुद्धा त्या त्या शाळांच्या पालकांचे व्हॉट्सॲप ग्रुप करून पालकांना माहिती दिली जात असते. विद्यार्थी शाळेत आला नाही किंवा त्यांनी गृहपाठ केला नसेल तर त्याचीदेखील माहिती पालकांपर्यंत पोहोचवली जाते. म्हणूनही शालेय स्तरावरची मोबाईलबंदी यशस्वी होईल की नाही अशी अनेकांना शंका येते. परंतु मोबाईल नसताना संपर्क ठेवला जात होता, अशी काही कारणे देऊन विद्यार्थ्यांच्या मोबाईल वापरावरच्या नियंत्रणाला खोडा घालण्याची आवश्यकता नाही. शालेय स्तरावर म्हणजेच शाळांच्या वेळांमध्ये कुठल्याही विद्यार्थ्याला मोबाईल वापरता येणार नाही एवढा जरी नियम केला तरी त्याचा बराच मोठा परिणाम दिसून येईल. शाळेच्या बाहेर आपापल्या पाल्यांच्या किंवा विद्यार्थ्यांच्या मोबाईल वापराची जबाबदारी पालकांवर टाकावी लागेल. ज्या पद्धतीचे दुष्परिणाम वेगाने समोर येत आहेत. ते लक्षात घेतले तर विद्यार्थ्यांची मोबाईल बंदी एक महत्त्वपूर्ण उपाय ठरतो. महाराष्ट्र सरकारने यासंदर्भात शक्य तितक्या लवकर उपाययोजना केली पाहिजे. कोवळ्या वयातील मुलांची मानसिकता योग्य पद्धतीने जोपासण्यासाठी अशा प्रकारचे उपाय गरजेचे ठरतात. अन्यथा आपणच विकृतीला आमंत्रण दिल्यासारखे ठरेल.